# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४००००५

दूरध्वनी : ०२२-२२१६ ३९६४/२२१६३९६५, फॅक्स : २२१६३९७६

ई-मेल : mercindia@merc.gov.in

संकेत-स्थळ : www.mercindia.org.in/www.merc.gov.in

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन) विनियम, २०१५ मध्ये करावयाच्या प्रस्तावित सुधारणेवर अभिप्राय मागविण्याबाबत**

जाहिरात क्र - / २०१७

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग त्यांच्या छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन विनियम, २०१५ मध्ये अन्य सर्व नूतनशील निर्मिती यंत्रणांचा समावेश करण्यासाठी सुधारणा करण्याचा विचार करीत आहे.

सदर विनियमांमध्ये करावयाच्या सुधारणेचा प्रारुप आयोगाच्या www.merc.gov.in/ www.mercindia.org.in या संकेत-स्थळांवर स्पष्टिकरणात्मक ज्ञापनासह उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

आयोग या प्रारुप सुधारणेवर लेखी अभिप्राय, सूचना/हरकती मागवित आहे. त्या ६ (१+५) प्रतींमध्ये सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५ यांना व्यक्तीशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेलने (फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६, ई-मेलः mercindia@merc.gov.in) या पत्त्यावर पाठवाव्यात.

सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती ज्या १७ जून, २०१७ पूर्वी आयोगास प्राप्त होतील त्या विनियमांतील या सुधारणेस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

सचिव, मविनिआ

मुंबई

दिनांक : २५ मे, २०१७